**<u>वादीतर्फे श्री.बी.डी.जाधव वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.</u>**

**१२.** हे खरे की, आमच्या कुंटूंबाची एकत्रीत जमीन २१ हेक्टर ६ आर आहे. मी पुन्हा सांगतो की, तशी ती होती. ती जमीन वडिलांनी आम्हाला वाटून दिली. त्या वाटणीचा दस्त तयार झालेला नाही. मी पुन्हा सांगतो की, दस्त झालेला आहे. तो दस्त मी न्यायालयात हजर करु शकतो. मी पुन्हा सांगतो की, वाटणीचा कागद झालेला नाही. वाटणी किती तारखेला कोणत्या महिन्यात झाली हे सांगता येत नाही. १९८६ साली ती वाटणी झाली. या वाटणीला यशवंत केंद्रे, पांडु गुट्टे, हणमंत केंद्रे हे साक्षीदार होते. हे खरे की, ते तिघेही मयत आहेत. हे खरे नाही की, तिघेही मयत असल्याने तेच साक्षीदार होते असे मी खोटे सांगतो. या साक्षीदारांशिवाय अन्य कोणीही वाटणीला हजर नव्हते. हे खरे की, मला दावा मिळकतीची माहिती आहे. बहिणींनी मिळकतीतील हक्क सोडला म्हणून वेगळा दस्त केलेला नाही. वादींनी १९८६ साली हा हक्क सोडून दिला. आमच्या वाटण्या बहिणींनी केल्या, वडिलांनी केल्या नाहीत. या वाटणीमध्ये कोणाला कोणती जमीन वाटून आली, हे मला सांगता येते. गट क्र.१२६ मध्ये मी, प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.७ यांना जमीन वाटून आली. गट क्र.१२७ ही प्रतिवादी क्र.४, ५, ८ यांना वाटून आली. हे खरे की, प्रतिवादी क्र.८ ही प्रतिवादी क्र.७ ची पत्नी आहे. हे खरे की, प्रतिवादी क्र.९ ही प्रतिवादी क्र.४ ची पत्नी आहे. हे खरे की, प्रतिवादी क्र.८ व ९ हे आपआपल्या पतीसोबत राहतात. हे खरे की, प्रतिवादी क्र.८ व ९ यांचा घटस्फोट झालेला नाही. हे खरे की, खिशाबाई यांचे एकत्र कुंटूंब आहे. हे खरे की, गंगाबाई यांचे एकत्र कुंटूंब आहे. हे खरे नाही की, वादींनी त्यांचा हिस्सा प्रतिवादी क्र.३ ते ७ यांच्या लाभात सोडून दिला असे मी खोटे सांगतो. वादींना हिस्सा मिळू नये म्हणून आम्ही भावांनी आपसात वाटणी करुन घेतली, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, वादींच्या अपरोक्ष वाटणी करुन फेरफार क्र.२७६ आम्ही मंजूर करुन घेतला. वादींना हिस्सा मिळू नये म्हणून जाणिवपुर्वक प्रतिवादी क्र.४ ने प्रतिवादी क्र.८ ला दावा मिळकतीपैकी १ हेक्टर २७ आर जमीन विकली,

हे खरे आहे. फेरफार क्र.५०९ हा वादींच्या अपरोक्ष मंजूर करुन घेतला, हे खरे नाही. हे खरे की, होकर्णा येथील गट क्र.१२७ मधील १ हेक्टर ५ आर जमीन तलावासाठी संपादीत झाली. त्या जमिनींचा मावेजा आम्ही भावडांनी आपसात वाटून घेतला यास माझे सांगणे की, ज्याच्या नावावर ती जमीन संपादीत झाली त्यानेच त्याचा मावेजा घेतला. गट क्र.१२६ मधील १ हेक्टर ६० आर जमीन वादी हिस्सा मागतील या भितीपोटी प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.९ ला विकली. या खरेदीपत्राचा क्र.४१०/२०२१ असा आहे, हे खोटे आहे. त्या खरेदीपत्राचा क्र.२५६ आहे. त्याचे साल मला आठवत नाही. त्या खरेदीपत्राला मी हजर होतो. त्या जमिनीचा मोबदला रुपये दहा लाख दिला होता. गंगाबाईच्या माहेरच्या लोकांनी तो मोबदला गुणाजीला दिला. मी या खरेदीपत्रावर सही केली. या खरेदीपत्रावर मी साक्षीदार म्हणून सही केली. खरेदीपत्र होत असताना मी हजर होतो. आता मला खरेदीपत्र दाखवले, त्यावर माझी सही नाही. हे खरे की, माझी सही नसण्याचे कारण की मी खरेदीपत्राला हजर नव्हतो. हे खरे की, मी खरेदीपत्राला हजर असल्याबद्दल मी शपथेवर खोटे सांगितले. शपथेवर खोटी साक्ष दिल्यास शिक्षा होते, याबद्दल मला माहिती नव्हते. खरेदीपत्राचा मोबदला रुपये १,३६,०००/- आहे. हे खरे की, खरेदीपत्राचा मोबदला रुपये दहा लाख असल्याचे मी खोटे सांगितले. हे खरे की, खरेदीपत्राबद्दल मला काहीच माहिती नव्हती, तरीही मी तसे खोटे सांगितले. हे खरे नाही की, असे खोटे सांगण्याचा उद्देश काहीही झाले तरी वादीला काही मिळू नये हा आहे. माणुस खोट बोलताना घाबरतो. हे खरे की, मी आता घाबरलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींना हिस्सा मिळू नये म्हणून खोटे खरेदीपत्र केलेले आहे. गंगाबाई आणि किशाबाई यांनी वाटणी मागितली होती, हे खरे नाही. होकर्णा येथील गट क्र.१२६ मधील १ हेक्टर ६० आर जमीन आजरोजी रामराव विठ्ठलराव घुगे, किशाबाई घुगे, सदाशीव घुगे, विठ्ठल रामराव घुगे यांच्या ताब्यात आहे. सदर जमीन रामरावने किशाबाईला विकताना या जमिनींचा ताबा तिला दिल्याचा उल्लेख जो खरेदीपत्रामध्ये आहे, तो

खरा आहे. मी रामराव, किशाबाई, सदाशीव आणि विठ्ठल यांचा या जमिनीत ताबा असल्याचे खोटे सांगतो, हे खरे नाही. मौजे होकर्णा येथील गट क्र.१२७ मधील १ हेक्टर ६० आर जमीन आजरोजी गुणाजी घुगे व सिताराम रामराव घुगे यांचा ताबा आहे. ती जमीन रामरावने किशाबाईला विकली. ते खरेदीपत्र दि.०५/०३/२००८ रोजीचे आहे, हे खरे आहे. ते खरेदीपत्र आता मला दाखवले. गुणाजीने गंगाबाई हिला ती जमीन त्या दिवशी विकली व ताबा दिला असा त्या खरेदीपत्रात उल्लेख आहे, हे खरे आहे. गुणाजी व सिताराम यांच्या ताब्यात जमीन असल्याचे मी खोटे सांगतो, हे खरे नाही. ताब्याचा मजकुर खरेदीपत्रातील बरोबर आहे की, मी आता सांगितलेला बरोबर आहे यास माझे उत्तर की, मी आता सांगितलेला ताब्याचा मजकूर खरा आहे. या जमिनीची मशागत विठ्ठल रामराव घुगे हे करतात. हे खरे की, या जमिनीचे उत्पन्न विठ्ठल रामराव घुगे हेच घेतात. पती-पत्नीमध्ये मिळकतीची वाटणी होणार नाही, हे म्हणणे बरोबर आहे. प्रतिवादी क्र.३ ते ७ यांच्यात १९८६ साली वाटणी झाली असे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. वादींनी आमच्या लाभात त्यांचा हिस्सा सोडून दिला असे मी खोटे सांगतो, हे खरे नाही. गट क्र.११० मध्ये ७५ आर जमीन आणि गट क्र.१११ मध्ये ७१ आर या जतिनी सिताराम घुगेच्या स्वकष्टार्जीत आहेत, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, माझी कैफीयत खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर खोटा आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**

**दिनांक: २२/०४/२०२६.**